# वंदन महात्मा बसवण्णांना



भारताच्या आणि जगाच्या इतिहासातील एक महान वैचारिक क्रांती घडवणारे, लिंगायत आणि वचन चळवळीचे निर्माते महात्मा बसवण्णा यांना 894व्या जयंतीनिमित्त विनम्र अभिवादन! 850 वर्षांपूर्वी जगाला समता, मानवता, लोकशाही, स्त्री-पुरुष समानता आणि विवेकवादाची वाट बसवण्णांनी आपल्या वचनांतून आणि कार्यातून दाखवली.

'शिव' म्हणजेच परमेश्वर किंवा परम-तत्त्व हे माणसातच आहे,
आपल्या सर्वांमध्ये आहे, याची लोकांना जाणीव करून देताना बसवण्णा म्हणाले –

**सुवर्णकलश मस्तक आणिक, स्तंभ माझे पाय**
**मम देहचि देवालय, पावन हो**

'शिव' सर्वांमध्ये आहे, म्हणजेच सर्व माणसे समान आहेत. जाती-पातींना काही अर्थ नाही –

**गर्भ हाच पिंडाचा आधार, सर्वांचा जन्म समान**
**सर्व जीव समान, मग वर्णाचे काय प्रयोजन ?**

**समता**
कलम 14-18

लिंगायत समूहामार्फत बसवण्णांनी समाजातील सर्व घटकांतून लोकांना एकत्र आणले. 'शरणांची, म्हणजे लिंगायत समुहात सामील झालेल्यांची, पूर्वीची जात नष्ट झाली. रोटी-बेटी व्यवहार सुरू झाला. माणसांमधील जातीच्या भिंती तुटल्या.

जातीने लादलेले पारंपारिक व्यवसाय सोडून समाजाला उपयोगी असे सर्वांना आपल्या आवडीचे काम, म्हणजेच 'कायक' करण्याचे स्वातंत्र्य लिंगायत संप्रदायाने दिले. सर्व समाजोपयोगी कामांना समान दर्जा दिला, श्रमाचा विटाळ नष्ट केला, अस्पृष्यता नष्ट केली –

**अस्पृष्यता नष्ट केली**
कलम 17

**माचय्याला परीट म्हणेन? कक्कय्याला चांभार म्हणेन ?**
**चेन्नय्याला मातंग म्हणेन? स्वतःला ब्राह्मण म्हणेन?**
**तर कूडलसंगमदेव मला हसेल!**

## अनुभव मंटप - भारतातील पहिली संसद

**लोकशाही**

बसवण्णांनी 'अनुभव मंटपा' ची स्थापना केली. अनुभव मंटपात, कायक करणारे शरण व शरणी एकत्र बसून, सामाजातील विविध समस्यांवर, आध्यात्मिक वचनांवर आणि अगदी वैयक्तिक समस्यांवरही चर्चा करत आणि सामुहिक निर्णय घेत. जातीव्यवस्थेने ज्यांना 'शूद्र' किंवा 'अस्पृष्य' मानले अशांना आणि स्त्रियांनाही, अनुभव मंटपात, त्यांचे विचार मोकळेपणाने मांडण्याचा अधिकार होता.

**स्वातंत्र्य**

अनुभव मंटप ही भारताची पहिली संसद होती, जिथे शरणांनी एकत्र बसून लोककल्याणाची चर्चा केली. हीच संसदीय लोकशाही आधुनिक भारतात राज्यघटनेने स्थापित केली. आपले संविधानही सर्वांना समान संधी, समान दर्जा देते. प्रत्येकाला मोकळेपणाने विचार व्यक्त करण्याचा अधिकार देते.

अनुभव मंटपात महिला व पुरुष ह्यांचा दर्जा समान होता. अनेक स्त्रियांनी वचन साहित्याची रचना केली आणि लिंगायतांचे नेतृत्वही केले. बसवणांनी ज्यांना सर्व संतांची मोठी बहीण मानले अशा अक्कमहादेवी म्हणातात की स्त्री अबला नाही –

> शूरपणाच्या गोष्टी केल्यास, मीं केव्हाचींच सज्ज वीरवेषात.
> सुगंध लेपून, लावून टिळा भाळावर, शस्त्र परजवींत रणीं उतरल्यावर,
> बांधलेल्या निऱ्या सुटल्या तर – तुमचीं आण पहा, चेन्नमल्लिकार्जुना.

**स्त्री-पुरूष समानता**
**कलम 15**

आणि शरणी गोग्गव्वे म्हणतात स्त्री आणि पुरुष यांच्यातील फरक फक्त शारीरिक आहे –

> येता स्तनांना उभारी, म्हणतात नारी
> फुटता मिसरूड जर, म्हणतात नर
> ज्ञान हे उभयाचे, नारी असो कीं नर, नास्तिनाथा

## संविधानातील समाजवादाची पाळेमुळे 'दासोह' मध्ये

**मार्गदर्शक तत्त्व**

लिंगायतांनी श्रम करून धान्य पिकवले, सर्व गरजेच्या वस्तू निर्माण केल्या, संपत्ती निर्माण केली. स्वतःच्या गरजेपुरती जितकी लागेल तितकीच वापरून, जास्तीची सर्व संपत्ती समाजाच्या कल्याणासाठी "दासोहा"मार्फत वाटून दिली. गरीब व निराधारांच्या भल्यासाठी ती संपत्ती वापरली जात असे. अशाप्रकारे संविधानातील 'समाजवाद' या मूल्याची पाळेमुळे आपल्याला शरण परंपरेत सापडतात.

याच तत्त्वाप्रमाणे भारताचे संविधान सांगते की – देशाची संपत्ती मुठभर श्रीमंतांकडे एकवटू नये, ती पूर्ण देशाच्या कल्याणासाठी वापरली जाईल, याची काळजी घेणे सरकारची जबाबदारी आहे.

## बसवण्णांचा विचार आणि भारतीय संविधान जागवूया – सर्वांपर्यंत पोहोचवूया

> कूडलसंगा, ऐकावे जी, स्थावर सारे नाशवंत
> जंगम तेचि शास्वत, हेचि सत्य




संपत्ती ही 'स्थावर' म्हणजेच नाशवंत आहे. पण माणासांमधले विचार हे 'जंगम' म्हणजेच गतीशील आणि जीवंत आहेत. जोवर माणसे विचार पसरवत राहतील, विचारांप्रमाणे जगत राहतील, तोवर ते कधीच नष्ट होणार नाहीत. बसवण्णांचे आणि भारतीय संविधानाचे विचार घरोघरी पोहोचवूया आणि त्यांना आपल्या कृतीतून अभिवादन करूया. 'संविधान जागर अभियान' यासाठी प्रयत्न करत आहे. आपणही यात सहभागी व्हावे, असे आवाहन.

# संविधान जागर अभियान

स्वप्निल फुसे: 79723 45764 | नागार्जुन वाडेकर: 98602 39899 | राजाभाऊ करवाडे: 98222 02739

samvidhanjagar.org